# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- ९५** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१५/०३/२०२४ रोजी दुपारी-१.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२२ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१५/०३/२०२४ रोजी दुपारी-१.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२२ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१५/०३/२०२४ रोजी दुपारी-१.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२२ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र :- ९६** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहायक संचालक, नगररचना यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./न.र./१७८६/२०२४ दि.२८/०३/२०२४
३. प्रमुख लेखापाल यांचा दि.२१/०२/२०२४ चा अभिप्राय.
४. मुख्यलेखा परीक्षक यांचा दि.२१/०३/२०२४ चा अभिप्राय.

**विषय :-** श्री.दिनेश नेमीचंद भारंबे यांचा दि.३०/०१/२०२३ रोजीच्या अर्जानूसार रेन वॉटर हार्वेस्टींग व ट्री प्लन्टेशन करीता भरणा केलेली अनामत रक्कम रु.७०००/- परत मिळणेस मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व सहायक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

श्री.दिनेश नेमीचंद भारंबे यांनी जळगांव स.नं.७५/१+२ प्लॉट नं.६० या जागेतील बांधकाम परवानगी घेतांना पावती क्रं.३५९५७ दि.०७/०६/२०११ अन्वये अनामत रक्कम रु.७०००/- भरणा केलेली असून सदरच्या जागेतील बांधकामास ऑनलाईन भोगवटा प्रमाणपत्र क्र.DDMCJ/FO/2024/APL/00600, Date - 17/01/2024 अन्वये देण्यात आलेले आहे. भोगवटा प्रमाणपत्र देते वेळेस प्रत्यक्ष जागेवर पहाणी करण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष जागेवर सदरच्या इमारतीस रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम बसविण्यात आलेली असून सदयस्थितीत विदयमान आहे. तसेच इमारती समोर अर्जदार यांनी ०५ झाडांचे वृक्षारोपण केलेले दिसुन आलेले आहे. तरी रेन वॉटर हार्वेस्टींग बसविणे व ट्री प्लन्टेशन बाबत पुर्तता झालेली असल्याने त्यापोटी भरण्यात आलेली व मनपा फंडात जमा असलेली अनामत रक्कम रु.७०००/- मात्रला ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अर्जदार श्री.दिनेश नेमीचंद भारंबे यांची अनामत रक्कम रु.७०००/- मात्र परतावा व अदा करणेस मान्यता मिळणेसाठी सहायक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र :- ९७** **दिनांक :- १९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहायक संचालक, नगररचना यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./न.र./१७८७/२०२४ दि.२८/०३/२०२४
३. प्रमुख लेखापाल यांचा दि.०२/०७/२०१९ चा अभिप्राय.
४. मुख्यलेखा परीक्षक यांचा दि.२१/०३/२०२४ चा अभिप्राय.

**विषय :-** श्री.रामदास ओंकार मराठे यांचा दि.२८/०९/२०१९ रोजीच्या अर्जानूसार रेन वॉटर हार्वेस्टींग व ट्री प्लन्टेशन करीता भरणा केलेली अनामत रक्कम रु.७०००/- परत मिळणेस मान्यता मिळणेबाबत.

वाचा क्र.१ व सहायक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

श्री.रामदास ओंकार मराठे यांनी मेहरुण स.नं.४५३ प्लॉट नं.५६ या जागेतील बांधकाम परवानगी घेतांना पावती क्रं.१५६४० दि.१२/०७/२०१३ अन्वये अनामत रक्कम रु.७०००/- भरणा केलेली असून सदरच्या जागेतील बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र क्र.०५८८, दि.१४/०३/२०१७ अन्वये देण्यात आलेले आहे. भोगवटा प्रमाणपत्र देते वेळेस प्रत्यक्ष जागेवर पहाणी करण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष जागेवर सदरच्या इमारतीस रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम बसविण्यात आलेली असून सदयस्थितीत विदयमान आहे. तसेच इमारती समोर अर्जदार यांनी ०५ झाडांचे वृक्षारोपण केलेले दिसुन आलेले आहे. तरी रेन वॉटर हार्वेस्टींग बसविणे व ट्री प्लन्टेशन बाबत पुर्तता झालेली असल्याने त्यापोटी भरण्यात आलेली व मनपा फंडात जमा असलेली अनामत रक्कम रु.७०००/- मात्रला ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने अर्जदार श्री.रामदास ओंकार मराठे यांची अनामत रक्कम रु.७०००/- मात्र परतावा व अदा करणेस मान्यता मिळणेसाठी सहायक संचालक, नगररचना यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र :-९८** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./न.र./४८/२०२४ दि.१६/०४/२०२४

**विषय :-** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे जळगांव स.नं.३९०/१/२ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१०,कंपोस्ट डेपो करीता बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत.

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (वाढीव हद्द) मौजे जळगांव स.नं.३९०/१/२ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१०,कंपोस्ट डेपो करीता आरक्षित जमिनीच्या क्षेत्राचे संपादनासंबंधी म.प्रा. व न. र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.शिरीष पंढरीनाथ खडके यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे त्या अनुषंगाने या कार्यालयाकडील अर्जदारास देण्यात आलेले टी.डी.आर बाबतचे पत्र जा.क्र./नर/१२०९ दि.१०/११/२०२३ अन्वये अर्जदार यांना त्यांच्या मालकीच्या जमिनीतुन आरक्षणाने बाधीत क्षेत्राच्या मोबदल्यात टी.डी.आर बाबत विचारणा केली असता त्यांनी दि.२२/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये टी.डी.आर घेण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे सदर आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन करणे आवश्यक झालेले आहे.

अर्जदार यांचे मालकीचे मौजे जळगांव स.नं.३९०/१/२ या जमिनीवरील आरक्षण क्र.१०, कंपोस्ट डेपो तसेच काही भागावर वाघुर पाटचारी करीता आरक्षीत दर्शविलेला आहे. तथापि वाघुर पाटचारी रद्द झालेली असुन या पाटचारीने बाधीत काही जमिनीमधुन बाधीत क्षेत्र कलम १२७ (२) च्या वैधानिक कार्यवाही अंती वगळल्याचे शासनाने अधिसुचीत केल्यानंतर त्या जमिनीमधील अभिंन्यासास मनपा स्तरावरुन मंजुरी देखील देण्यात आलेली आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या जमिनीवरील कंपोस्ट डेपो या आरक्षणा खालील अर्जदार यांच्या मालकीच्या जमिनीचे एकुण क्षेत्र १२६००.०० चौ.मी. गृहीत धरुन आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडे सादर करुन भुसंपादन प्रक्रिया ०२ वर्षाच्या आत पुर्ण करणे आवश्यक आहे. या कामी विषयांकीत जमिनीचे सन २०२३-२४ च्या शिघ्रसिध्दगणका मधील दरानुसार रु.५६८०/- प्रति चौ.मी इतके आहे त्या अनुषंगाने भुसंपादन कामी अपेक्षीत खर्च खालील प्रमाणे होईल.

| प्रयोजन | शिवार | स.नं. | भुसंपादन क्षेत्र | शि.सि.गणक दर/चौ.मी | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| आरक्षण क्रं.१०, कंपोस्ट डेपो | जळगांव | ३९०/१/२ | १२६००.०० चौ.मी | रू.५६५०/- (२०२३-२४) | रू.७,११,९०,०००/- + रू.७,११,९०,०००/- |
| | | | | | रू.१४,२३,८०,०००/- |

वरील प्रमाणे रू.१४,२३,८०,०००/- खर्च अपेक्षीत असुन, संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च, व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,जळगांव यांचेकडेस

पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. विभागाने कलम १२७ नूसार कार्यवाही तात्काळ प्रस्तावित करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र :-९९** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./न.र./२४२/२०२४-२५ दि.२४/०५/२०२४

**विषय :-** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.१६९/२/ब या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.२५७ व २५८ अनुक्रमे हायस्कुल व प्लेग्राऊंड या आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत.

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.१६९/२/ब या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.२५७ व २५८ अनुक्रमे हायस्कुल व प्लेग्राऊंड करीता आरक्षित जमिनीच्या क्षेत्राचे संपादनासंबंधी म.प्रा. व न. र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्रीमती अरुणा अशोक पाटील व इतर यांनी श्रीमती शकुंतला पी.काबरा व इतर यांनी जळगांव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये या कार्यालयास प्राप्त दि.२५/०८/२०२३ रोजीची खरेदी सुचना प्राप्त दि.२८/०८/२०२३ अन्वये नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे त्या अनुषंगाने विकास योजना आरक्षणाने बाधीत होणाऱ्या क्षेत्राच्या मोबदल्यात टी.डी.आर बाबत जमिन मालक यांना या कार्यालयाकडील अर्जदारास देण्यात आलेले टी.डी.आर बाबतचे पत्र जा.क्र./नर/१२१४, दि.२०/११/२०२३ अन्वये विचारणा केली असता त्यांनी कुठलाही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे सदर आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन करणे आवश्यक झालेले आहे.

अर्जदार यांचे मालकीचे मौजे मेहरुण स.नं.१६९/२/ब या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.२५७ व २५८ अनुक्रमे हायस्कुल व प्लेग्राऊंड या आरक्षणा खालील जमिनीचे एकुण क्षेत्र १९०००.०० चौ.मी असुन आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडे सादर करुन भुसंपादन प्रक्रिया ०२ वर्षाच्या आत पुर्ण करणे आवश्यक आहे. या कामी विषयांकीत जमिनीचे सन २०२४-२५ च्या शिघ्रसिध्दगणका मधील दरा नुसार रु.२४००/- प्रति चौ.मी इतके आहे त्या अनुषंगाने भुसंपादन कामी अपेक्षीत खर्च खालील प्रमाणे होईल.

| प्रयोजन | शिवार | स.नं. | भुसंपादन क्षेत्र | शि.सि.गणक दर/चौ.मी | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| आरक्षण क्रं.२५७ व २५८ अनुक्रमे हायस्कुल व प्लेग्राऊंड | मेहरुण | १६९/२/ब | १९०००.०० चौ.मी | रू.२४००/- (२०२४-२५) | रू.४,५६,००,०००/- + रू. ४,५६,००,०००/- |
| | | | | | रू.९,१२,००,०००/- |

वरील प्रमाणे रू.९,१२,००,०००/- खर्च अपेक्षीत असुन, संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च, व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,जळगांव यांचेकडेस पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. विभागाने कलम १२७ नूसार कार्यवाही तात्काळ प्रस्तावित करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०६** **प्रशासक ठराव क्र :-१००** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./न.र./२४३/२०२४-२५ दि.२४/०५/२०२४

**विषय :-** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.३७२/१/२/३ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.२४८अ, प्लेग्राऊंड व पब्लिक स्कुल या आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.३७२/१/२/३ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.२४८ अ, प्लेग्राऊंड व पब्लिक स्कुल करीता आरक्षित जमिनीच्या क्षेत्राचे संपादनासंबंधी म.प्रा. व न. र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्रीमती अरुणा अशोक पाटील व इतर यांनी जळगांव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये या कार्यालयास प्राप्त दि.२२/१२/२०२३ रोजीची खरेदी सुचना प्राप्त दि.०४/०१/२०२४ अन्वये नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे त्या अनुषंगाने विकास योजना आरक्षणाने बाधीत होणाऱ्या क्षेत्राच्या मोबदल्यात टी.डी.आर बाबत जमिन मालक यांना या कार्यालयाकडील अर्जदारास देण्यात आलेले टी.डी.आर बाबतचे पत्र जा.क्र./नर/०४८, दि.०१/०४/२०२४ अन्वये विचारणा केली असता त्यांनी दि.१२/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये टी.डी.आर घेण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे सदर आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन करणे आवश्यक झालेले आहे.

अर्जदार यांचे मालकीचे मौजे मेहरुण स.नं.३७२/१/२/३ या जमिनीवरील आरक्षण क्र.२४८अ, प्लेग्राऊंड व पब्लिक स्कुल या आरक्षणा खालील जमिनीचे एकुण क्षेत्र १२२८.४४ चौ.मी असुन आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडे सादर करुन भुसंपादन प्रक्रिया ०२ वर्षाच्या आत पुर्ण करणे आवश्यक आहे. याकामी विषयांकीत जमिनीचे सन २०२४-२५ च्या शिघ्रसिध्दगणका मधील दरानुसार रु.१७५०/- प्रति चौ.मी इतके आहे त्या अनुषंगाने भुसंपादन कामी अपेक्षीत खर्च खालील प्रमाणे होईल.

| प्रयोजन | शिवार | स.नं. | भुसंपादन क्षेत्र | शि.सि.गणक दर/चौ.मी | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| आ. क्र.२४८अ, प्लेग्राऊंड व पब्लिक स्कुल | मेहरुण | ३७२/१/२/३ | १२२८.४४ चौ.मी | रू.१७५०/- (२०२४-२५) | रू.२१,४९,७७०/- + रू.२१,४९,७७०/- |
| | | | | | रू.४२,९९,५४०/- |

वरील प्रमाणे रू.४२,९९,५४०/- खर्च अपेक्षीत असुन, संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च, व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,जळगांव यांचेकडेस पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. विभागाने कलम १२७ नूसार कार्यवाही तात्काळ प्रस्तावित करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०७** **प्रशासक ठराव क्र :-१०१** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./न.र./२४५/२०२४-२५ दि.२४/०५/२०२४

**विषय :-** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.४१५/१३अ/३/१ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.४४,प्लेग्राऊंड ने बाधीत जमिनीचे भुसंपादनाबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहराच्या मंजुर विकास योजनतील (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.४१५/१३अ/३/१ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.४४,प्लेग्राऊंड करीता आरक्षित जमिनीच्या क्षेत्राचे संपादनासंबंधी म.प्रा. व न. र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.सुधामामल पारथामल रामचंदाणी व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे त्या अनुषंगाने विकास योजना आरक्षणाने बाधीत होणाऱ्या अर्जदार यांना त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील अर्जदारास देण्यात आलेले टी.डी.आर बाबतचे पत्र जा.क्र./नर/८८९, दि.०१/०९/२०२३ अन्वये अर्जदार यांना त्यांच्या मालकीच्या जमीनीतुन आरक्षणाने बाधीत क्षेत्राच्या मोबदल्यात टी.डी.आर बाबत विचारणा केली असता त्यांनी दि.१५/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये टी.डी.आर घेण्यास नकार दिलेला आहे. तद्नंतर मा.प्रशासक ठराव क्र.४७, दि.११/०१/२०२४ अन्वये जमिन मालकास Reservation Accommondation बाबत विचारणा करणेबाबत ठराव पारीत केलेला होता त्या अनुषंगाने जमीन मालक यांना या कार्यालयाकडील अर्जदारास देण्यात आलेले Reservation Accommondation बाबतचे पत्र जा.क्र./नर/१५६७, दि.१६/०२/२०२४ अन्वये विचारणा केली असता अर्जदार यांनी आवक क्र.३४६०, दि.११/०३/२०२४ रोजीचा खुलासा अन्वये Reservation Accommondation ऐवजी रोख स्वरुपात मोबदला मिळणे बाबत विनंती केलेली आहे. त्यामुळे सदर आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन करणे आवश्यक झालेले आहे.

अर्जदार यांचे मालकीचे मौजे मेहरुण स.नं.४१५/१३अ/३/१ या जमिनीवरील आरक्षण क्र.४४,प्लेग्राऊंड या आरक्षणा खालील जमिनीचे एकुण क्षेत्र २३००.०० चौ.मी असुन आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडे सादर करुन भुसंपादन प्रक्रिया ०२ वर्षाच्या आत पुर्ण करणे आवश्यक आहे. या कामी विषयांकीत जमिनीचे सन २०२४-२५ च्या शिघ्रसिध्दगणका मधील दरा नुसार रु.८२१०/- प्रति चौ.मी इतके आहे त्या अनुषंगाने भुसंपादन कामी अपेक्षीत खर्च खालील प्रमाणे होईल.

| प्रयोजन | शिवार | स.नं. | भुसंपादन क्षेत्र | शि.सि.गणक दर/चौ.मी | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| आ. क्र.४४ प्लेग्राऊंड | मेहरुण | ४१५/१३अ/३/१ | २३००.०० | ८२१० | रू.१,८८,८३,०००/- + रू.१,८८,८३,०००/- |
| | | | | | रू.३,७७,६६,०००/- |

वरील प्रमाणे रू.३,७७,६६,०००/- खर्च अपेक्षीत असुन, संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च, व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,जळगांव यांचेकडेस पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. विभागाने कलम १२७ नूसार कार्यवाही तात्काळ प्रस्तावित करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३ (महासभा)**

**विषय क्र.:- ०८ प्रशासक ठराव क्र :-१०२ दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./न.र./४२७/२०२४-२५ दि.०३/०७/२०२४

**विषय :-** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.३८६/२/३/ब, या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.२४५, पार्किंग व फायर ब्रिग्रेड करीता बाधीत जमिनीचे भुसंपादनाबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.३८६/२/३/ब, या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.२४५, पार्किंग व फायर ब्रिग्रेड व आ.क्र.२६६, म्युनिसीपल ऑफिस व ३०.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने करीता आरक्षित जमिनीच्या क्षेत्राचे संपादनासंबंधी म.प्रा. व न. र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.निलेश शांतीलाल ललवाणी व इतर यांनी नियोजन प्राधीकरणास श्री.निलेश शांतीलाल ललवाणी यांनी जळगाव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये या कार्यालयास प्राप्त दि.०१/१२/२०२३ रोजीची नोटीस दिलेली आहे त्या अनुषंगाने विकास योजना आरक्षणाने बाधीत होणाऱ्या क्षेत्राच्या मोबदल्यात टी.डी.आर बाबत या कार्यालयाकडील अर्जदारास देण्यात आलेले टी.डी.आर बाबतचे पत्र जा.क्र./नर/१२९५ दि.१३/१२/२०२३ अन्वये विचारणा केली असता त्यांनी दि.१८/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये टी.डी.आर घेण्यास नकार दिलेला आहे. तथापि, सेक्टर ०६ व सेक्टर ०७ मधील ३०.०० मी रुंद विकास योजना रस्त्याच्या जागेच्या मोबदल्यात टी.डी.आर देण्यात यावा या प्रमाणे मे.उच्च न्यायालय मुंबई, खंडपिठ औरंगाबाद येथे दाखल रिट पिटीशन क्र.१०८२७/२०१७ यामध्ये दि.०३/१०/२०२२ रोजी देण्यात आलेल्या निकालात निर्देश दिलेले आहेत. तसेच आ.क्र.२६६ ही जागा सेक्टर ०७ मध्ये अंतर्भुत असुन, जळगांव शहराकरीता शासनाने अधिसुचना क्रं.टी.पी.एस.३५९९/७३८/सी.आर.१४२ (ए) युडी-९ दि.११/०२/२००२ अन्वये मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि.०७/०४/२००२ पासुन अंमलात आहे तसेच उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना (इ.पी) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५०३/४९३/सी.आर-१०२ (ए) /०३ युडी-९ दि.१०/०८/२००४ व्दारे मंजुर केलेली आहे. व ती दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आलेली आहे. त्यानुसार सेक्टर ७ मधील जमिनी आरक्षणातुन वगळण्यात आलेल्या असुन सदयस्थितीत नाविकास क्षेत्रात समाविष्ट आहे. त्यामुळे सदरचे आरक्षण अस्तित्वात नसल्याने त्या खालील जमिनीचे संपादनाचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे अर्जदार यांना “३०.०० मी रुंद विकास योजना रस्त्याखालील जागेचा मोबदला टी.डी.आर स्वरुपातच देण्यात येईल” या प्रमाणे कळविणेस मान्यतेसाठी सादर.

तसेच उर्वरीत आरक्षण क्र.२४५ या आरक्षणांखालील बाधीत जमिनीचे भुसंपादन करणे आवश्यक झालेले आहे. अर्जदार यांचे मालकीचे मौजे मेहरुण स.नं.३८६/२/३/ब या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.२४५, पार्किंग व फायर ब्रिग्रेड व आ.क्र.२६६, म्युनिसीपल ऑफिस, या आरक्षणा खालील जमिनीचे एकुण क्षेत्र २०८२.३७ (१११३+९६९.३७) चौ.मी असुन आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडे सादर करुन भुसंपादन प्रक्रिया ०२ वर्षाच्या आत पुर्ण करणे आवश्यक आहे. याकामी विषयांकीत जमिनीचे सन २०२४-२५ च्या शिघ्रसिध्दगणका मधील दरा नुसार रु.१६६०/- प्रति चौ.मी इतके आहे त्या अनुषंगाने भुसंपादन कामी अपेक्षीत खर्च खालील प्रमाणे होईल.

| प्रयोजन | शिवार | स.नं. | भुसंपादन क्षेत्र | शि.सि.गणक दर/चौ.मी | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| आ. क्र.२४५, पार्किंग व फायर ब्रिग्रेड व आ.क्र.२६६, म्युनिसीपल ऑफिस | मेहरुण | स.नं.३८६/२/३/ब | २०८२.३७ चौ.मी | रु.१६६०/- (२०२४-२५) | रू.३४,५६,७३४/- + रू.३४,५६,७३४/- |
| | | | | | रू.६९,१३,४६८/- |

वरील प्रमाणे रू.६९,१३,४६८/- खर्च अपेक्षीत असुन, संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च, व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,जळगांव यांचेकडेस पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. विभागाने कलम १२७ नूसार कार्यवाही तात्काळ प्रस्तावित करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०९** **प्रशासक ठराव क्र :-१०३** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./न.र./२८९/२०२४-२५ दि.०५/०६/२०२४

**विषय :-** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.२५७/२ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१७०,टॉउन हॉल व लायब्ररी तसेच आ.क्र.१७०अ प्लेग्राउंड या आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.२५७/२ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१७०,टॉउन हॉल व लायब्ररी तसेच आ.क्र.१७०अ प्लेग्राउंड करीता आरक्षित जमिनीच्या क्षेत्राचे संपादनासंबंधी म.प्रा. व न. र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.अनिलकुमार बिरबलदास साहित्या व इतर यांनी जळगाव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये या कार्यालयास प्राप्त दि.०९/०३/२०२३ रोजीची खरेदी सुचना प्राप्त दि.१४/०३/२०२४ अन्वये नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे त्या अनुषंगाने विकास योजना आरक्षणाने बाधीत होणाऱ्या क्षेत्राच्या मोबदल्यात टी.डी.आर बाबत जमिन मालक यांना या कार्यालयाकडील टी.डी.आर बाबत पत्र जा.क्र./नर/१२३५ दि.२३/११/२०२३ अन्वये विचारणा केली असता त्यांनी दि.२३/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये टी.डी.आर घेण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे सदर आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन करणे आवश्यक झालेले आहे.

अर्जदार यांचे मालकीचे मौजे मेहरुण स.नं.२५७/२ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१७०, टॉउन हॉल व लायब्ररी तसेच आ.क्र.१७०अ प्लेग्राऊंड या आरक्षणा खालील जमिनीचे एकुण क्षेत्र ७५६२.३७ चौ.मी असुन आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडे सादर करुन भुसंपादन प्रक्रिया ०२ वर्षाच्या आत पुर्ण करणे आवश्यक आहे. याकामी विषयांकीत जमिनीचे सन २०२४-२५ च्या शिघ्रसिध्दगणका मधील दरा नुसार रु.३६५०/- प्रति चौ.मी इतके आहे त्या अनुषंगाने भुसंपादन कामी अपेक्षीत खर्च खालील प्रमाणे होईल.

| प्रयोजन | शिवार | स.नं. | भुसंपादन क्षेत्र | शि.सि.गणक दर/चौ.मी | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| आ. क्र.१७०,टॉउन हॉल व लायब्ररी तसेच आ.क्र.१७०अ प्लेग्राऊंड | मेहरुण | २५७/२ | ७५६२.३७५ चौ.मी | रु.३६५०/- (२०२४-२५) | रू.२,७६,०२,६६९/- + रू.२,७६,०२,६६९/- |
| | | | | | रू.५,५२,०५,३३८/- |

वरील प्रमाणे रू.५,५२,०५,३३८/- खर्च अपेक्षीत असुन, संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च, व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,जळगांव यांचेकडेस पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. विभागाने कलम १२७ नूसार कार्यवाही तात्काळ प्रस्तावित करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३ (महासभा)**

**विषय क्र.:- १० प्रशासक ठराव क्र :-१०४ दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./आरोग्य वि./४००/२०२४-२५ दि.०९/०७/२०२४
३. सहा.आयुक्त (आरोग्य) यांचा दि.३/७/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०४/०७/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०४/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंध कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रिया करणे तदनंतर अॅन्टी रेबीज लसीकरण करुन उजव्या कानावर V नॉच करुन पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी सदरच्या कामासाठी AWBI मान्यता प्राप्त संस्थेची निवड करणे ई-निविदा प्रक्रिया करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व आरोग्याधिकारी, आरोग्य, विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रिया करणे तदनंतर अॅन्टी रेबीज लसीकरण करुन उजव्या कानावर V नॉच करुन पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी कार्यादेश क्रं.आरोग्य/जा.क्र.३९८ दि.१३/०८/२०२१ नुसार दि.१७/०८/२०२१ ते दि.१६/०८/२०२४ पर्यंत रु.९३८/- प्रति श्वान प्रमाणे मे.नवसमाज निर्माण बहुउद्देशिय संस्था, नंदुरबार यांना मक्ता देण्यात आलेला असुन मक्तेदार मार्फत दि.२३/०८/२०२१ ते दि.०४/०३/२०२४ पर्यंत मेल श्वान-१५२७४ व फिमेल श्वान-११७९० असे एकूण २७०६४ श्वानांवर शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे.

मे.नवसमाज निर्माण बहुउद्देशिय संस्था, नंदुरबार यांचे बाबत अॅनिमल वेल्फेअर बोर्ड यांचे दि.१३/११/२०२३ रोजीचे पत्र व मा.उपायुक्त, जिल्हा पशुसंवर्धन विभाग,जळगांव यांनी सादर केलेल्या चौकशी अहवाल तसेच मक्तेदार यांचेवर दि.०२/०३/२०२४ रोजी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन,जळगांव फिर्याद क्रं.०१४१/२०२४ दाखल केलेली फिर्याद त्यानुसार तत्कालीन आयुक्त यांचे मान्यतेने जा.क्र./आरोग्य/९७०/ दि.०४/०३/२०२४ रोजीचे आदेशानुसार मे.नवसमाज निर्माण बहुउद्देशिय संस्था, नंदुरबार यांचे श्वान निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करण्याचे काम तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आलेले आहे.

जळगांव शहर महानगरपालिका मार्फत शहरातील भटक्या व मोकाट कुत्र्यांची सर्वेक्षण करण्यात आलेले नाही. आज रोजी शस्त्रक्रिया न झालेले अंदाजे १२ ते १५ हजार मोकाट कुत्र्यांची संख्या आहे. त्यामध्ये भटक्या कुत्र्यांपासून नागरीकांना चावा घेण्याचे प्रमाण सुध्दा वाढलेले आहे. त्यामुळे स्थानिक वृत्तपत्रात, सन्मा.सदस्य यांचेकडून तक्रारीचे प्रमाण सुध्दा वाढलेले आहे. तसेच शासनामार्फत सुध्दा भटक्या व मोकाटी कुत्र्यांवर नियंत्रणासाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवालाची वेळोवेळी मागणी होत आहे.

सदयस्थितीत असलेले मक्तेदार मे.नवसमाज निर्माण बहुउद्देशिय संस्था, नंदुरबार यांचे तांत्रिक कारणास्तव काम तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आलेले असुन त्याची मुदत दि.१६/०८/२०२४ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रिया करणे तदनंतर ॲन्टी रेबीज लसीकरण करुन उजव्या कानावर V नॉच करुन पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी जाहिर ई-निविदा मागवुन अभिकर्त्याची नेमणुक करणे आवश्यक आहे.

प्रस्तावीत कामासाठी २ वर्षाकरिता अंदाजे रक्कम रु.२ कोटी ४७ लक्ष खर्च अपेक्षीत असून सन-२०२४-२५ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकात कुत्र्यांवर निर्बिजीकरण व शस्त्रक्रिया करणे या लेखाशिर्षकाखाली रु.१ कोटी २५ लक्ष तरतूद करण्यात आलेली असून आजपावेतो या आर्थिक वर्षात सदर कामासाठी खर्च झालेला नसुन सदर लेखाशिर्षकाखाली रु.१ कोटी २५ लक्ष रक्कम शिल्लक असून प्रस्तावित कामासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी साधारणत: अंदाजित खर्च तितकाच येणार असून शिल्लक रक्कमेतुन सदरचे काम प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी जाहिर निविदा मागवुन अभिकर्त्याची नेमणुक करणे कामी नियमाप्रमाणे ई-निविदेसाठी अटी व शर्ती निश्चित करुन शासनाच्या संकेतस्थळावर व जाहिर निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करणेस व प्रसिध्दी कामी येणाऱ्या खर्चास तसेच प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेबाबत आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- ११** **प्रशासक ठराव क्र :-१०५** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. कार्यकारी कर अधिक्षक, किरकोळ वसुली विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./कि.व./१०७२/२०२४-२५ दि.०९/०७/२०२४
३. सहा.आयुक्त(महसुल) यांचा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०५/०७/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०८/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रदर्शित करण्यात येणारे झेंडे, चिन्ह लावण्याकरीता परवानगी देणेसाठी रु.१२/- प्रती नग प्रती दिवस याप्रमाणे परवाना फी तसेच प्रचाराकरीता वाटण्यात येणारे प्रचारपत्रक सिंगल कलर करीता रु.३००/- प्रती १००० प्रतींकरीता व प्रचारपत्रक मल्टीकलर करीता रु.५००/- प्रती १००० प्रतीकरीता याप्रमाणे परवाना फी आकारणेबाबत.

---

वाचा क्र.१ व कार्यकारी कर अधिक्षक, किरकोळ वसुली विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या कामी बॅनर/झेंडे/प्रचारपत्रक/प्रचार साहित्य इत्यादींबाबत परवानगी देण्याची कार्यवाही करणे बाबत मा.जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी यांच्या कडील जा.क्र./निवड-०५/का.वि./१४१/ २०२४ दि.२१/०३/२०२४ रोजीचे आदेशान्वये इकडील कार्यालयास आदेशीत करण्यात आलेले होते.

परंतु इकडील कार्यालयाकडुन यापुर्वी बॅनर/झेंडे/प्रचारपत्रक/प्रचार साहित्य इत्यादींबाबत परवानगी देतांना परवाना फी कोणत्या दराने आकारणी करावी हे निश्चित करण्यात आलेले नव्हते त्यामुळे इतर महानगरपालिकेशी संपर्क साधून तसेच मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जळगांव यांचेकडील जा.क्र./निवड-०५/का.वि./१७७/२०२४ दि.०४/०४/२०२४ च्या पत्राच्या आधारे, झेंडे, चिन्ह लावण्याकरीता परवानगी देणेसाठी रु.१२/- प्रती नग प्रती दिवस याप्रमाणे परवाना फी तसेच प्रचारपत्रक सिंगल कलर करीता रु.३००/- प्रती १००० प्रतींकरीता व प्रचारपत्रक मल्टीकलर करीता रु.५००/- प्रती १००० प्रतीकरीता याप्रमाणे परवाना फी आकारणे करिता मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या दि.२२/०४/२०२४ रोजी कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रदर्शित करण्यात येणारे झेंडे, चिन्ह लावण्याकरीता परवानगी देणेसाठी रु.१२/- प्रती नग प्रती दिवस याप्रमाणे परवाना फी तसेच प्रचाराकरीता वाटण्यात येणारे प्रचारपत्रक सिंगल कलर करीता रु.३००/- प्रती १००० प्रतींकरीता व प्रचारपत्रक मल्टीकलर करीता रु.५००/- प्रती १००० प्रतीकरीता याप्रमाणे परवाना फी आकारणेबाबतचे प्रस्तावास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत कार्यकारी कर अधिक्षक, किरकोळ वसुली विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- १२** **प्रशासक ठराव क्र :-१०६** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./आ.वि./४०३/२०२४-२५ दि.१०/०७/२०२४
३. सहा.आयुक्त(आरोग्य) यांचा दि.२२/०५/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०४/०६/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.१०/०६/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** मनपा सार्वजनिक शौचालयाची पुर्ण वेळ दैनंदीन साफसफाई ठेवणे तसेच शौचालयाची दैनंदीन देखभाल दुरुस्तीसह, पाणी, जंतूनाशके इ.अनुषंगीक बाबींची व्यवस्था करणेकामी २ वर्षांकरीता अभिकर्त्याची नेमणूक करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जा.क्र./जशमनपा/आ.वि./१०/२०२०-२१ दिनांक ०६/०४/२०२१ रोजीच्या कार्यादेशानुसार मे.दिपक लोचाराम उत्तराधी,अमरावती यांना जशमनपा सार्व.शौचालयाच्या १६५५ सिट्सची दैनंदिन साफसफाई करणे, शौचालयामध्ये मनपा देईल ते दैनंदिन जंतुनाशके व दुर्गंधीनाशक टाकणे. तसेच सार्व.शौचालयाच्या ठिकाणी केअरटेकरची नेमणूक करणेचे काम तिन वर्षे कालावधीसाठी देण्यात आले होते. सदरचा मक्ता दि.११/०४/२०२४ रोजी संपुष्टात आलेला आहे.

मनपा सार्वजनिक शौचालयाची पुर्ण वेळ दैनंदिन साफसफाई ठेवणे. तसेच शौचालयाची दैनंदिन देखभाल दुरुस्तीसह, पाणी, जंतूनाशके इ.अनुषंगीक बाबींची व्यवस्था करणेकामी २ वर्षांकरीता अभिकर्त्याच्या नेमणुकीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. करीता सदयस्थितीत ११८१ सिट्स वापरात आहे. यापैकी काही सिट्स निष्काशीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. सिट्सच्या संख्येत कालांतराने बदल होणार आहे. करीता एकुण ११८१ सिट्सच्या साफसफाई कामाची ई-निविदा प्रक्रिया राबविणे योग्य राहील.

एकुण ११८१ सिट्स करीता प्रति सिट अपेक्षीत खर्चाचे अंदाज पत्रकानुसार प्रति सिट प्रति माहे अंदाजे एकुण रुपये ८००/- प्रमाणे मासिक एकुण रुपये ९,४४,८००/- लक्ष यांप्रमाणे वार्षीक १,१३,३७,६००/- आणि दोन वर्षांसाठी एकुण रुपये २,२६,७५,२००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

सदरचा खर्च मनपा निधी अंतर्गत सार्व.स्वच्छता विभाग,सार्वजनिक शौचालय साफसफाई या लेखाशिर्षाखाली सन-२०२४-२५ आर्थीक वर्षात रु.७५ लक्ष मात्रची तरतूद करण्यात आलेली असून आजपावेतो रक्कम रु.११,२२,७३०/- खर्च झालेला असून रक्कम रुपये ६३,७७,२७०/- शिल्लक आहे. सदरचे काम दरवर्षी करण्यात येणाऱ्या अंदाजपत्रकीय तरतुदी मधून खर्च भागविण्यात येईल. सदर खर्चासाठी सुधारीत अंदाजपत्रकात वाढीव तरतूद करुन घेणेत येईल.

उपरोक्त नुसार शहरातील सार्व.शौचालय साफसफाई करणे करीता अभिकर्त्याची नेमणूक करणेकामी अटी व शर्तीसह प्रारुप निविदा प्रपत्र मसूदा तयार करणेत आलेले असून सदरचा मसूदा मान्यतेसाठी तसेच शासनाच्या संकेतस्थळावर व जाहीर निविदा सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यास येणाऱ्या खर्चास व प्रस्तावित कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेसाठी आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. तथापी विभागाने नियमाप्रमाणे ई-निविदेतील अटी-शर्ती निश्चीत करुन घेवून निविदा तात्काळ प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- १३** **प्रशासक ठराव क्र :-१०७** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./पा.पु.विभाग/९५/२०२४-२५ दि.१०/०७/२०२४

३. शहर अभियंता यांचा दि.२८/०६/२०२४ चा अभिप्राय

४. उपायुक्त यांचा दि.२८/०६/२०२४ चा अभिप्राय

५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०४/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियाना अंतर्गत जळगांव पाणी पुरवठा योजनेची यांत्रिकी कामे व विदयुत कामे करणेबाबत.

वाचा क्र.१ व उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

केंद्र शासनाच्या अमृत अभियानाअंतर्गत जळगांव पाणी पुरवठा योजनेचे रु.२४९.१६ कोटीचे अंदाजपत्रकास महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं./अमृत-२०१६/प्र.क्रं.१४५ (४)/नवि-२२ दिनांक २३ जुन २०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर कामाचे रु.२४९.१६ कोटीचे अंदाजपत्रकास मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे कडील पत्र क्रं./मु.अ./नाशिक/तां/शां/१/तां.मा/पुर्नसुधा/७६०/२०१६ दि.२१/०४/२०१६ अन्वये तांत्रिक मान्यता दिलेली आहे. तसेच सदर कामाचे रु.२५३.२५ कोटीचे सुधारीत अंदाजपत्रकास शासन निर्णय क्रं./अमृत-२०१६/प्र.क्रं.१४५ (४)/नवि-३३ दिनांक ३ मे २०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

अमृत अभियाना अंतर्गत जळगांव शहर पाणी पुरवठा प्रकल्पातील यांत्रिकी व विदयुत यांत्रिकी कामासाठी मा.सह सचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्रं./बैठक-२०२०/प्रक्रं.४९/नवि-३३ दिनांक २८/०२/२०२० नुसार रु.८,०४,३४,३०८/- मान्यता मिळाली. निविदा प्रसिध्द होवून मे.भैरव इलेक्ट्रोमेक वर्क्स,जळगांव यांनी ३.४८% जादा दराने दर देकार देवून रक्कम रु.८,३२,३३,४२२/- आली. या रक्कमेस म.स्थायी समिती ठ.क्रं./२१६ दि.१०/०१/२०२० नुसार मंजुरी प्रदान केलेली आहे. मे.भैरव इलेक्ट्रोमेक वर्क्स,जळगांव यांनी कामाबाबत करारनामा केलेला असून कार्यादेश क्रं.जमनपा/सा.बां./१९/२०२० दि.२१/०५/२०२० नुसार त्यांना कामाचा कार्यादेश देणेत आलेला आहे.

सदर योजनेचे काम करतांना काही बाबी योजना पूर्ण करण्यासाठी आवश्यक होत्या, परंतु निविदेत समाविष्ट नव्हत्या त्यामुळे रक्कम रु.३,८९,१४,२२९/- जादा बाब दर अ.क्र.१, २, ४, ५, ६, ७ मा.आयुक्त सो यांच्या मान्यतेने करण्यात आल्या. मुख्य अभियंता यांना सुधारीत योजनेस म मु अ मजीप्रा नाशिक यांनी पत्र क्र/मु अ/ नाशिक/चित्र/१३५३/२०२२ दि.२४/०३/२०२२ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केली व म. सहसचिव, नगरविकास यांनी अमृत-२०२०-२१/प्र.क्रं.७५/नवि-५५ दि.१४/०१/२०२२ अन्वये वरील बदलासह व GST सह रक्कम रु.९,६३,११,६९८/- मात्रला प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे. परंतु योजना पुर्ण करताना निविदेतील बाबींच्या परिमाणात काही ठिकाणी वाढ झाली व ती खंड-३८ प्रमाणे अधीक्षक अभियंता यांचेकडील अंतर्गत वाढीच्या प्रस्तावानुसार रक्कम रु.४०,९१,७५४/- मात्रच्या खर्चास आयुक्त, मनपा, जळगांव यांनी त्यांस मान्यता प्रदान केली आहे.

आजपावेतो झालेल्या कामावरील खर्चाचा तपशिल -

१) धावते देयक क्रं.१२ नुसार अदायगी झालेला खर्च रक्कम रु.७,१४,१९,७८९.७५

२) धावते देयक क्रं.१३ नुसार अदायगीसाठी सादर केलेला खर्च रक्कम रु.८०,३८,७९६.१९

३) धावते देयक क्रं.१२+१३ एकूण रक्कम रु.७,९४,५८,५८६.५७

४) सुधारीत मुळ निविदा रक्कम रु.९,६३,११,६९८.००

५) अ.नं. ४-३=बचत रक्कम (९,६३,११,६९८ -७,९४,५८,५८७ = रु.१,६८,५३,१११)

निविदेतील करारानुसार खंड -३८ व त्या अनुषंगिक खंड -१४ प्रमाणे कार्यवाही करुन मंजुरी घेऊन सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत असून तरी ज्या बाबी नव्याने समाविष्ट आहेत व त्या वरील खर्च खंड -३८ नुसार Higher Authority ची मंजुरी घ्यावी अशी तरतूद असल्याने सदर खर्चास मान्यता मिळणेबाबत उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- १४** **प्रशासक ठराव क्र :-१०८** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./म.बा.क.वि./०५/२०२४-२५ दि.०८/०७/२०२४
३. सहा.आयुक्त यांचा दि.१४/०६/२०२४ चा अभिप्राय
४. प्रमुख विधी सल्लागार यांचा दि.०६/०६/२०२४ चा अभिप्राय
५. उपायुक्त (सा.क.) यांचा दि.१४/०६/२०२४ चा अभिप्राय
६. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.३०/०५/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागांतर्गत मानधन तत्वावरील बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना दि.१६/०४/२०२४ ते १४/०६/२०२४ या कालावधीतील उन्हाळी सुटीत त्यांची सेवा खंडित करुन त्यांना दि.१५/०६/२०२४ ते ३०/११/२०२४ या कालावधीसाठी त्यांना मा.प्रशासक/महासभा ठरावाच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधीन राहुन अटी शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नियुक्ती देणेबाबत.

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागातर्गत असलेल्या बालवाडी मधील मराठी माध्यमाच्या १० शिक्षिका व ९ मदतनीस यांना व सेमी इंग्रजी माध्यमाच्या १९ शिक्षिका व ९ मदतनीस यांना म.आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र.जा.क्र.२४०९ व २४१० दि.२९/११/२०२३ अन्वये दि.०१/१२/२०२३ ते दि.१५/०४/२०२४ या कालावधीसाठी मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात आल्या होत्या. उन्हाळी सुटीमुळे उक्त शिक्षिका व मदतनीस यांना दि.१६/०४/२०२४ ते दि.१४/०६/२०२४ या कालावधीत खंड देवुन मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतुदीनुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरिता मानधन तत्वावरील तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेश देणे आवश्यक असल्याने दि.१५/०६/२०२४ ते दि.३०/११/२०२४ या कालावधीसाठी मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेश देणे व मानधनासाठी दरमहा येणारा खर्च रु.३,८९,०००/- मात्र तसेच बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांच्या जुन २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत मानधनासाठी येणारा अंदाजित खर्च रु.२३,३४,०००/- (तेवीस लक्ष चौतीस हजार मात्र) महिला व बालकल्याण निधीतुन खर्च करणेस मान्यता मिळणेसाठी अधिक्षक, महिला बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने जळगांव शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागांतर्गत मानधन तत्वावरील बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांना दि.१६/०४/२०२४ ते १४/०६/२०२४ या कालावधीतील उन्हाळी सुटीत त्यांची सेवा खंडित करुन त्यांना दि.१५/०६/२०२४ ते ३०/११/२०२४ या कालावधीसाठी अटी-शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नियुक्ती देण्यात यावी. सदरचे बालवाडी शिक्षिका व मदतनीस यांच्या तात्पुरत्या स्वरुपाच्या सेवा या अखंडीतपणे २४० दिवसांच्या होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच संबंधीत कंत्राटी/तात्पुरते कर्मचारी यांचे कडुन विहित बंधपत्र हमीपत्र घेवुन भविष्यात मनपाची जबाबदारी/नियमीत करणे, सामावुन घेणे, नोकरीचा हक्क इ.राहणार नाही./ करणार नाही. यांचे लेखी बंधपत्र घ्यावे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- १५** **प्रशासक ठराव क्र :-१०९** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./म.बा.क.वि./०६/२०२४-२५ दि.०८/०७/२०२४

३. सहा.आयुक्त यांचा दि.११/०६/२०२४ चा अभिप्राय

४. उपायुक्त (सा.क.) यांचा दि.११/०६/२०२४ चा अभिप्राय

५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०४/१२/२०२३ चा अभिप्राय

**विषय :-** सन-२०२४-२५ या शालेय वर्षाकरीता जळगांव शहर महानगरपालिका संचलीत बालवाडीतील मुलांना पुरक पोषण आहार पुरविणेबाबत.

---

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

बालवाडी पोषण आहार पुरविणेची निविदा २०२३-२४ या वर्षासाठी होती. आर्थिक व शैक्षणिक वर्ष संपायला असतांना तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आचार संहीता दि.१६ मार्च २०२४ पासून लागू झाल्याने भविष्यात लेखा परिक्षणाच्या दृष्टीने आक्षेपार्ह बाब असल्याने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाची ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेबाबत व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात माहे जुन २०२४ पासून सुरु होणाऱ्या नविन बालवाडी शैक्षणिक सत्रात बालवाडी पोषण आहार पुरविणेबाबत सन २०२३-२४ ची ई निविदा प्रक्रिया रद्द करणे व सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरीता नव्याने ई-निविदा प्रस्तावित करण्यास व त्यासाठी होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. सदर कामी विभागाने नियमाप्रमाणे कमी कालावधीची निविदा काढावी व त्यामध्ये पात्र बचत गटांचा सुध्दा प्राधान्याने समावेश करावा.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- १६** **प्रशासक ठराव क्र :-११०** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./सार्व.स्वच्छता वि./४०८/२०२४-२५ दि.११/०७/२०२४

३. सहा.आयुक्त यांचा दि.१०/०४/२०२४ चा अभिप्राय

४. उपायुक्त यांचा दि.१२/०४/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** सार्व.शौचालय साफसफाई मक्तेदार मे.दिपक लोचाराम उत्तराधी,अमरावती यांना मुदतवाढ देणेस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जा.क्र./जशमनपा/आ.वि./१०/२०२०-२१ दिनांक ०६/०४/२०२१ रोजीच्या कार्यादेशानुसार मे.दिपक लोचाराम उत्तराधी,अमरावती यांना जशमनपा सार्व.शौचालयाच्या १६५५ सिट्सचे दैनंदीन साफसफाई करणे, शौचालयामध्ये मनपा देईल ते दैनंदीन जंतुनाशके व दुर्गंधीनाशक टाकणे. तसेच सार्व.शौचालयाच्या ठिकाणी केअरटेकरची नेमणूक करणेचे काम तिन वर्षे कालावधीसाठी देण्यात आले होते. सदरचा मक्ता दि.११/०४/२०२४ रोजी संपुष्टात येणार आहे.

१) सदर कामी नवीन मक्तेदार नियुक्तीसाठी ई-निविदा प्रक्रीया राबविणेची प्रक्रीया सुरु आहे. सदर प्रक्रीया पुर्ण होऊन नवीन मक्तेदार नियुक्त होण्यास जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे. तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची आचारसंहिता काही दिवसांतच घोषीत होण्याची शक्यता आहे करीता सार्व.शौचालयाच्या दैनंदीन साफसफाईच्या कामामध्ये अडचण येऊ नये या अनुषंगाने पुर्वनियुक्त मक्तेदार मे.दिपक लोचाराम उत्तराधी, अमरावती यांना नवीन मक्तेदार नियुक्त होईपर्यंतची मंजूर दराप्रमाणे कामाची मुदतवाढ देता येईल. सार्व.शौचालयाच्या सदयस्थितीत एकुण १२३७ सिट्स वापरात आहे. मंजूर दरानुसार रु.३७३/- प्रती सिट प्रती माहे नुसार दरमहा रु.४,६१,४०१/- प्रमाणे पुढील ४ महिन्यांकरीता रक्कम रु.१८,४५,६०४/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

किंवा

२) सार्वजनिक स्वच्छता विभागाकडील घनकचरा संकलन व वाहतूक करणे तसेच ४०० सफाई कामगार पुरवठाकामी नियुक्त असलेले मक्तेदार मे.वाटर ग्रेस प्रोडक्ट नाशिक यांचे मंजूर दरानुसार आवश्यक संख्येइतके सफाई कामगार घेवून सार्व.शौचालय साफसफाई करुन घेता येईल. सदयस्थितीत सार्व.शौचालयाचे एकुण ४५ तट आहेत. व त्यामध्ये स्त्रियांच्या ६६३ व पुरुषांच्या ५७४ असे एकुण १२३७ सिट्स वापरात आहे. सदर ४५ तटांपैकी काही तट जवळच्या अंतरावर आहेत. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि.१४/०८/१९९० च्या शासन निर्णयानुसार एका सफाई कामगारास सार्व.शौचालयाच्या ५० सिट्स सफाईकामी देता येईल. त्या अनुषंगाने सार्व.शौचालयाचे तट व एकुण सिट्स प्रकरणा सोबत जोडले आहे. त्याप्रमाणे एकुण १२३७ सिट्सकरीता ३० सफाई कामगारांची आवश्यकता आहे. त्याकरीता किमान वेतन कायदयानुसार २५ कामगारांसाठी दरमहा रु.४,०३,०००/- प्रमाणे पुढील ४ महिन्यांकरीता रु.१६,१२,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्त नुसार नवीन मक्तेदार नियुक्त होईपर्यंत पुर्वनियुक्त मक्तेदार मे.दिपक लोचाराम उत्तराधी,अमरावती यांना मुदतवाढ देणे. याकरीता येणारा खर्च मनपा आर्थीक तरतूद २०२४-२५ मधील सार्व.स्वच्छता विभाग सार्वजनिक शौचालय साफसफाई या लेखाशिर्षकाखालील रु.७५ लक्ष मात्रच्या तरतुदीतून करता येईल. सदरकामी म.आयुक्त तथा प्रशासक यांचे महासभेच्या ठरावाकामी कार्योत्तर मंजुरीच्या घेणेच्या अधिन राहून मा.आयुक्त (तत्कालीन) यांच्या दि.१२/०४/२०२४ रोजीच्या मान्यतेने प्रस्तावित अ.क्र.१ नुसार जा.क्र./सार्व.स्वच्छता/४२/२०२४-२५ दि.१२/०४/२०२४ नुसार ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होऊन नविन मक्तेदार नियुक्त होईपावेतोची मंजूर दरातच मुदतवाढ देण्यात आली आहे. करीता सदर मुदतवाढीस व त्यास येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो मुदतवाढ देणेस मंजूरी देण्यात येत आहे. विभागाने तात्काळ निविदा प्रक्रिया पूर्ण करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- १७** **प्रशासक ठराव क्र :-१११** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. मिळकत व्यवस्थापक, मिळकत व्यवस्थापन विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./मा.व्य.वि./१०७८/२०२४-२५ दि.१०/०७/२०२४
३. सहा.आयुक्त यांचा दि.२९/०५/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त (सा.क.)यांचा दि.३०/०५/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.१८/०६/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** मनपा मालकीची सि.स.नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) या जागेवर वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर दोन वर्षा करीता वाहन तळ चालविणे कामी अभिकर्ता नेमणूक करणेबाबत.

वाचा क्र.१ व मिळकत व्यवस्थापक, मिळकत व्यवस्थापन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मालमत्ता व्यवस्थापन विभागाअंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या सि.स.नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) या जागेवर महासभा ठराव क्र.७४६ दि.१४/०२/२०२२ नुसार देकार रक्कम व दरपत्रक निश्चित करुन दोन वर्षाकरीता वाहनतळ चालविणे कामास मान्यता देण्यात आली त्यानुसार जाहिर ई-निविदा सूचना प्रसिध्द निविदेत नमुद केलेल्या अटी-शर्तीसह श्री.किरण शंकर भालोदकर, रा.२१, रथचौक, कोळीपेठ, जळगांव यांनी रु.५७,००,०००/- मात्र (अक्षरी-रु.सत्तावन्न लक्ष) सर्वोच्च देकार दिला आहे. महासभा ठराव क्र.८३७ दि.३०/०५/२०२२ नुसार करारनामा करुन घेऊन कार्यादेश क्र.जमनपा/जा.क्र./१०२५/मि.व्यवस्थापन/२०२२-२३ दि.१९/०७/२०२२ अन्वये श्री.किरण शंकर भालोदकर, रा.२१, रथचौक, कोळीपेठ, जळगांव यांना वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर दि.२०/०७/२०२२ पासून दोन वर्षा करीता वाहन तळ चालविणे कामी अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

उक्त मक्त्याची मुदत दि.२०/०७/२०२४ रात्री ००.०० वा. पासून संपत असुन गणेशोत्सव कालावधीत नागरीकांना वाहन पार्कींगसाठी वाहन तळ विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबत मा.आयुक्त सो. यांच्या आदेशान्वये गणेशोत्सव कालावधीत दि.३१/०८/२०२२ ते दि.०९/०९/२०२२ पर्यंत नागरीकांना वाहनतळ सुविधा विनामुल्य उपलब्ध करुन देणेत आली होती. तसेच सदरचा दहा दिवसाचा कालावधीची भरपाई मक्त्याच्या पुढील कालावधीत वाढ करुन देण्यात येईल याबाबतचे आदेश जमनपा/मि.व्य./१३१३/२०२२-२३ दि.३०/०८/२०२२ रोजी देण्यात आले होते. सदर प्रकरणी तत्कालीन आयुक्त सो. यांच्या दि.०९/११/२०२२ रोजीच्या मान्यतेने उपायुक्त यांच्या आदेशान्वये मक्त्याचा कालावधी संपल्यानंतर म्हणजेच दि.२०/०७/२०२४ रात्री ००.०० वा. पासून पुढील दहा दिवसाकरिता म्हणजेच दि.२१/०७/२०२४ ते दि.३०/०७/२०२४ रात्री १२.०० पर्यंतचा कालावधी मक्तेदार श्री.किरण शंकर भालोदकर यांना वाढवुन देण्यात आलेला आहे. म्हणजे उक्त मक्त्याची दि.३०/०७/२०२४ रोजी रात्री १२.०० वाजता मुदत संपत आहे.

प्रस्तुत प्रकरणी कार्यालयीन आदेश जा.क्र.जमपा/उ.आ.का./४२९/२०२४ दि.१५/०५/२०२४ अन्वये विभागामार्फत वार्षिक निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असल्यास मुदत संपण्यापूर्वी ५ महिने अगोदर निविदा प्रक्रिया कार्यवाही सुरु होईल याचे नियोजन करण्यात येवून मुदत संपण्या अगोदरच कामाचे कार्यादेश देण्यात यावेत याबाबतचे कार्यालयीन आदेश प्राप्त झाले आहे.

जळगांव शहर महानगरपालिका मालकीची सि.स.नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) या जागेवर वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर चालविणेकामी ई-निविदा प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदा मध्ये दोन

वर्षाकरीता वाहनतळ चालविणे कामी कमीत कमी देकार रक्कम रु.२१,००,०००/- मात्र ठेवण्यात आली होती. त्यानुसार सदर निविदा प्रक्रियेत आठ निविदाधारक यांनी सहभाग घेतला होता त्यात सर्वोच्य देकार रक्कम रु.५७,००,०००/- मात्र (अक्षरी रु.सत्तावन्न लक्ष) इतका महसुल महापालिकेला मिळालेला आहे.

तरी सदर मक्त्याची मुदत संपल्यानंतर वाहनतळ चालविणेस देणे कामी मागील सर्वोच्च देकार रक्कम रु.५७,००,०००/- मात्र वर १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रुपये ६२,७०,०००/- मात्र देकार रक्कम निश्चित करुन ई-निविदा करता येईल. सबब रक्कम रुपये- ६२,७०,०००/- मात्र देकार निश्चित करुन दोन वर्षाकरिता वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर चालविणेस ई-निविदा प्रक्रिया करणे कामी मान्यता मिळणेसाठी मिळकत व्यवस्थापक, मिळकत व्यवस्थापन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मक्तेदार श्री.किरण शंकर भालोदकर यांना दिलेल्या मक्त्याची मुदत दि.३०/०७/२०२४ रोजी रात्री १२.०० वाजता संपत आहे. प्रकरणी दि.०१/१२/२०१६ चे शासन निर्णयानूसार ई-निविदा रक्कम अंदाजित करुन स्पर्धात्मक ई-निविदा प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया करणेकामी २ महिने किंवा निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- १८** **प्रशासक ठराव क्र :-११२** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहायक आयुक्त (महसुल) यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./प्र.स.क्र.०१ ते ०४/१०७९/२०२४-२५ दि.१०/०७/२०२४
३. सहा.आयुक्त यांचा दि.१९/०६/२०२४ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२७/०६/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे मालमत्ता कर मॉडयुल व पाणीपट्टी मॉडयुल चे IGR प्रणालीशी API Integration करणेबाबत.

वाचा क्र.१ व सहायक आयुक्त (महसुल) यांचेकडील वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

“भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना, २०२३-२४” अंतर्गत “भाग- ४ - नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आर्थिकसुधारणा करुन त्यांना कर्जरोख्यासाठी पतपात्र बनवणे आणि जारीकरणे” बाबत वित्त मंत्रालय भारत सरकार यांचे पत्र क्र.F.NO.४४(१)/PF-S/२०२३-२४ (CAPEX)(Pt.) दि.१९/०६/२०२३, मा.उपसचिव, नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्रमांक-संकीर्ण-२०२३/प्र.क्र.८१/नवि-४, दि.०७/०७/२०२३ तसेच नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्रमांक-संकीर्ण-२०२३/प्र.क्र.८१/नवि-४, दि.१४/०९/२०२३ प्राप्त झाले असुन सदर पत्रांमध्ये या भागामध्ये निश्चीत केलले कार्यवाही विविध टप्पे Milestone १ ते ४ गाठल्यास केंद्र शासनाकडून प्रोत्साहन रक्कम उपलब्ध होणार असुन सदर रक्कम संबंधीत शहरांना त्यांच्या क्षेत्रातील पायाभुत प्रकल्पांसाठी खर्च करता येणार आहेत. केंद्रशासनाच्या सदर योजनांतर्गत Milestone १ बाबतचा प्रस्ताव शासनास पाठविलेला असुन सदर Milestone १ मध्ये खालील प्रमाणे पुर्ण करणे महानगरपालिकेस अनिवार्य आहेत.

i. Digitized property tax register- GIS/drone technology.
ii. Unification of municipal databases.
iii. Unification of property tax register with state utility record.
iv. Linking of property tax register with state stamp duty register.
v. Online self-assessment mechanism for property tax
vi. Integrated and digitized billing and collection of property tax
vii. Adoption of property tax reporting mechanism through management information system MIS/ dashdoard.

उक्त प्रमाणे नमुद कामे करण्यासाठी महानगरपालिकेत लागणारे पुरेशे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नाही, तसेच सदरचे काम हे केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मुदतीत पुर्ण करावयाचे असल्याने ते बाहय खाजगी अभिकर्त्याकडून करुन घेणे योग्य होईल.

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जवळपास एकुण १३२००० मिळकती असुन उक्त नमुद कामासाठी प्रती मिळकत अंदाजे रु.१५०/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. म्हणजेच सदर कामी अंदाजे एकुण रु.२ कोटी खर्च अपेक्षीत आहे. तरी सदरचे काम बाहय खाजगी अभिकर्त्यामार्फत करणेकामी निविदा प्रसिध्द करणेस तसेच सदर कामी येणाऱ्या

अंदाजे रु.२ कोटीच्या खर्चास वित्तीय प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी सहायक आयुक्त (महसुल) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने दि.०१/१२/२०१६ चे शासन निर्णया मधील निर्देश, शासनाकडील मार्गदर्शक सुचना यानुसार ई-निविदा अटी-शर्ती ठरवुन प्रचलित पध्दतीने ई-निविदेस पुरेशी प्रसिध्दी देवुन (विभागीयस्तर / राज्यस्तर) पुढील कार्यवाही करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- १९** **प्रशासक ठराव क्र :-११३** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अतिक्रमण विभाग प्रमुख, अतिक्रमण निर्मुलन विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./अति.नि.वि./२१/२०२४-२५ दि.०९/०७/२०२४
३. सहा.आयुक्त (महसुल) यांचा दि.०१/०७/२०२४ चा अभिप्राय अभिप्राय
४. उपायुक्त (महसुल) यांचा दि.०२/०७/२०२४ चा अभिप्राय अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.०५/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस आवश्यकते प्रमाणे कामगारांचा पुरवठा करणे बाबत (आवश्यकते प्रमाणे यात वाढ, घट होवु शकते)

वाचा क्र.१ व अतिक्रमण विभाग प्रमुख, अतिक्रमण निर्मुलन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस सदयस्थितीत मनुष्यबळ कमी असल्याने सन-२०२३-२४ करीता मा.आयुक्त सो यांनी दि.२३/०९/२०२२ रोजी ५० मजुर लावण्यास मान्यता देणेत आली असता या विभागास आवश्यकतेनुसार एकुण ३५ मजुर लावण्यास रॅपिट सिक्यु अॅड लेबर सर्व्हीस,जळगाव यांचे सेवा शुल्कांचे दर सर्वात कमी आल्याने त्यांना कार्यादेश देण्यात आलेले होते.

सन-२०२४-२५ करीता सुध्दा अतिक्रमण निर्मुलन विभागास मजुरांची आवश्यकता असल्याने अतिक्रमण निर्मुलन विभागाकडे सन-२०२३-२४ करीता कंत्राटी मजुर व वाहने व इतर साहीत्य खरेदी हया हेडखाली बजेट तरतुद रु.१,००,००,०००/- (एक कोटी) तसेच सन-२०२४-२५ करीता बजेट तरतुद रु.१,२५,००,०००/- (एक कोटी पंचविस लाख) मागणी केलेली आहे. असता रु.७०,००,०००/- (सत्तर लाख) अशी कमीची बजेट तरतुद करण्यात आलेली आहे.

मा.कामगार आयुक्त, मुंबई यांचे दिनांक- ०५/०२/२०२४ च्या परीपत्रकानुसार अ.क्र.४९ वर अतिक्रमण निर्मुलन विभागास ३५ कामगार विशेष भत्यांची रक्कम रु.६,१२०/- असुन त्यानुसार खालीलप्रमाणे प्रति दिवस किमान वेतन प्रमाणे आहे.

| मुळ वेतन | + | विशेष भत्ता | = | एकुण किमान वेतन |
|---|---|---|---|---|
| १०,००० | + | ६,१२० | = | १६,१२०/- |

वरील एकुण किमान वेतनास २६ ने भागुन येणारी रक्कम रु.६२०/- एक दिवसांचे देय राहील.

अपेक्षीत कामगार ३५ किमान वेतन दर रु.६२०/- प्रति कामगार प्रति दिवस + मक्तेदाराचे अंदाजे सेवाशुल्क ५% प्रमाणे रु.३१/- प्रति कामगार प्रति दिवस असे एकुण ६५१/- प्रति कामगार प्रति दिवस

| | | |
|---|---|---|
| ३५ कामगार X किमान वेतन दर रु.६५१/- प्रति कामगार प्रति दिवस | = | रु.२२,७८५/- |
| प्रति महा | = | रु.५,९२,४१०/- |
| प्रति वर्ष | = | रु.७१,०८,९२०/- |

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षा करीता वरील अंदाजपत्रकीय खर्च अपेक्षीत आहे. तरी सदर खर्चास व ई निविदा प्रसिध्द करण्यांस अतिक्रमण विभाग प्रमुख यांनी मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो मुदतवाढ देण्यात येत आहे.

तथापी मनुष्यबळ पुरविणेबाबत एकाच अभिकर्त्याची नियुक्ती करणे उचित असल्याने सर्व विभागासाठी मनुष्यबळ पुरविणेकामी निविदा प्रक्रिया ही सामान्य प्रशासन आस्थापना विभागामार्फत राबविणेत यावी, तशी मागणी आस्थापना विभागाकडे नोंदवावी. त्याचबरोबर ज्या ज्या विभागांना बाह्ययंत्रणेमार्फत पुरविणेत येणाऱ्या मनुष्यबळाची आवश्यकता असेल, अशा सर्व विभाग व विभाग प्रमुख यांनी आवश्यक मनुष्यबळाच्या तपशीलासह (कुशल / अकुशल) (पदनाम व संख्या) उपायुक्त (सा.प्र.) यांचेकडेस मागणी नोंदवावी व आस्थापना विभागामार्फत बाह्ययंत्रणेमार्फत पुरविणेत येणाऱ्या मनुष्यबळा संदर्भातील, नियम, शासन निर्णय, मार्गदर्शक तत्वे इ. बाबी विचारात घेवून निविदा प्रक्रिया राबवावी व निविदा प्रक्रिये संदर्भातील उचित व आवश्यक तो प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करावा व तदनंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. तथापि सदर निविदा प्रक्रिया अंतिम होईपावेतो प्रस्तुत अभिकर्त्यास मनुष्यबळ पुरविणेकामी मुदतवाढ देणेत येत आहे. नविन निविदा प्रक्रिया सा.प्र.विभागाने नियमानुसार यथाशीघ्र अंतिम करणेची दक्षता घ्यावी

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- २०** **प्रशासक ठराव क्र :-११४** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./जमनपा/प्रकल्प विभाग/३५/२०२४ दि.१०/०७/२०२४
३. उपायुक्त (प्रकल्प) यांचा दि.१०/०६/२०२४ चा अभिप्राय अभिप्राय
४. मुख्य लेखाधिकारी यांचा दि.१८/०६/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२७/०६/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** केंद्र शासनाच्या अमृत १.० अभियानाअंतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी मक्तेदार जैन इरीगेशन सिस्टीम्स लि.जळगांव यांचे स्थापत्य कामातील वाढीव जादा परीमाणानुसार (खंड-३८) करावयाच्या बाबींमुळे वाढीव खर्चासह एकुण अंदाजपत्रकीय खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे १८९ अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

केंद्र शासनाच्या अमृत अभियाना अंतर्गत जळगाव पाणी योजनेचे रू.२४९.१६ कोटीचे अंदाजपत्रकास शासनाने शासन निर्णय क्रं.अमृत २०१६/प्र.क्रं.१४५(४)/नवि-३३ दिनांक २३ जून २०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर कामाचे रू.२४९.१६ कोटीचे अंदाजपत्रकास मुख्यअभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी शासन निर्णय क्रं.अमृत २०१६/प्र.क्रं.१४५(४)/नवि-३३ दिनांक २३ जून २०१६ अन्वये तांत्रिक मान्यता दिलेली आहे. तसेच सदर कामाचे रू.२५३.२५ कोटी चे सुधारीत अंदाजपत्रकास मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्रं. मुअ/नाशिक/ तांशा-1 /तां.मा./पुर्नसुधा/७६०/२०१६ दिनांक- २१-०४-२०१६ अन्वये तांत्रिक व मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्रं. मुअ/नाशिक/ तांशा-३ /५८२/२०१६ दिनांक-१३.०४.२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सोलर कामाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.२५२,८७,६७,९९४/- येते. राज्य स्तरीय तांत्रिक समितीने सदर कामी सुधारीत बचत-वाढ प्रस्तावास शासन निर्णय क्रं.अमृत २०१९/प्र.क्रं.२३८(६)/नवि-३३ दिनांक २९.०८.२०१९ अन्वये मान्यता दिलेली असून त्यानुसार सुधारीत अंदाजित रक्कम रू.२५३,२३,९८,५००/- आहे. त्यानुसार मक्तेदार यांचे काम पुर्णत्वाच्या मार्गावर आहे.

सदर काम सुरू असतांना कलम ३८ नुसार सुधारीत मंजूर प्रस्तावातील कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक जादा परीमाणांची प्रस्तावात नमूद कामे करणे क्रमप्राप्त असल्याने याबाबतचे आदेश मक्तेदार जैन इरीगेशन सि लि जळगाव यांना दिलेले होते. कामांची यादी संदर्भ क्रं. 2 चे प्रस्तावात नमूद आहे.

सदर कामी निविदेतील कलम -३८ नुसार वाढीव परीमाणाची कामे करणेसाठी तरतूद आहे. सदरची कामे मूळ काम करणेसाठी आवश्यक असल्यास व अभियंता यांची खात्री झाल्यास निविदेतील कलम १४ नुसार अशी कामे करणे मक्तेदारास बंधनकारक असते. तसेच कराराच्या विशेष शर्ती पृष्ठ क्रं. ३७ वरील शर्त क्रं.०१ नुसार वाढीव परीमाणाचे काम करण्यासाठी मक्तेदारास लिखीत स्वरूपात कळविणे आवश्यक आहे, त्यानुसार पाणी पुरवठा अभियंता यांनी मक्तेदार यांना सदर कामे करणेबाबत कळविलेले आहे.

सदर प्रकरणी जळगाव पाणी पुरवठा योजनेच्या कामास २ वेळा प्रशासकीय मान्यता व ०१ वेळा सुधारीत फेर बदलास मान्यता मिळालेली आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणेः

१) प्रशासकीय मान्यता दि.२३.०६.२०१६ रू. २४९,१६,३५,९९४/-
२) प्रशासकीय मान्यता दि.०३.०५.२०१८ रू. २५३,२५,३५,९९४/-
३) फेर बदल मान्यता दि.१४.०१.२०२२ रू.२५३,२३,९८,५००/-

सुधारीत मान्यतेनुसार योजनेचा आकृतीबंध व मंजूर अनुदान यांची स्थिती :

| प्रशासकीय मान्यता | केंद्र शासन ५०% | राज्य शासन २५% | महानगरपालिका २५% |
|---|---|---|---|
| रू.२५३,२३,९८,५००/- | रू.१२६,६१,९९,२५०/- | रू. ६३,३०,९९,६२५/- | रू.६३,३०,९९,६२५/- |
| **पोर्टलवर जमा रक्कम** | रू.१२६,६१,९९,२५०/- | रू.६३,३०,९९,६२५/- | रू.६२,३९,६८,५९३/- |

| उप कामे | आकृती बंधानुसार प्रस्तावित | काम निहाय आजपावेतो झालेला खर्च |
|---|---|---|
| *पाणी पुरवठा कामे स्थापत्य* | रू.२०३,७३,२९,९६८/- | रू.२०२,६७,२६,९१४/- |
| *विदयुत कामे* | रू. ९,६३,११,६९९/- | रू.७,०३,९०,६२१/- |
| *इतर कामे पाईप व सोलर* | रू. ३९,८७,५६,८३४/- | रू. ३९,८७,५६,८३४/- |
| ***एकुण*** | **रू.२५३,२३,९८,५००/-** | **रू.२४९,५८,७४,३६९/-** |

मक्तेदार यांना आदेश दिलेली कामे ही मूळ काम पुर्ण करण्यासाठी आवश्यक आहे. सदर कामांची तांत्रिक पडताळणी कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, जळगाव यांनी त्यांचे कडील मजीप्राविज/तांशा-०१/१०८०/२०२४ दि.१७.०५.२०२४ अन्वये वाढीव खर्चाच्या रकमेचा व्दितीय खंड -३८ चा प्रस्ताव तांत्रिक छाननी करून तांत्रिक दृष्टया योग्य असून वाढीव परीमाणाचे कामास मंजुरीसाठी शिफारस केलेली आहे.या वाढीव कामांवर रू.७,३५,१६,३९४/- खर्च येणार असून हा खर्च मंजूर प्रशासकीय रकमेपेक्षा (रू. २५३,२३,९८,५००/-) जास्तीचा येणार आहे.

शासन निर्णय क्रं.अमृत २०१६/प्र.क्रं.१४५(४)/नवि-३३ दिनांक २३ जून २०१६ च्या प्रशासकीय मान्यता आदेशानुसार " राज्य शासनामार्फत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी प्रकल्प मंजूर झाल्यानंतर, मूळ प्रकल्प किंमतीमध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील. राज्य शासनामार्फत त्या करीता कोणतेही वाढीव अनुदान उपलब्ध केले जाणार नाही " असे ४.१३ मध्ये नमूद आहे. सह सचिव, नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रं.अमृत-२०२१/प्र.क्रं.७५/नवि-३३ दि.१४.०१.२२ नुसार सदर प्रकल्पासाठी प्रथम खंड -३८ चा प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मान्यता दिलेली असून त्यात झालेल्या निर्णयात क्रं.०७ वर नमूद केल्यानुसार सुधारीत रू.२५३.२४ कोटी रकमेनुसार केंद्र व राज्य शासन हिस्सा अनुज्ञेय असून त्याव्यतिरीक्त येणारा उर्वरीत आर्थिक भार उभारणे मूळ प्रशासकीय मान्यता आदेशातील तरतूदीनुसार जळगाव महानगरपालिकेस बंधनकारक राहील असा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे वाढीव आवश्यक कामासाठी खर्च महानगरपालिकेस स्वनिधीतून उभारण्याच्या सुचना आहेत.

जळगाव महानगरपालिकेस १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शासन निर्णय दिनांक २८.१०.२०२० मधील अ.क्रं.०२ (अ) तरतूदीनुसार बंधनकारक अनुदानातून (Tied Grants) Drinking water संबंधित कामांवर एकुण प्राप्त अनुदानापैकी ५०% अनुदान खर्च करणे बंधनकारक आहे. आजमितीस लेखा विभागाकडील अहवालानुसार या शिर्षावर रू.१८,१०,३९,८९०/- निधी चिन्हांकीत आहे. या चिन्हांकीत निधीपैकी प्रस्तावित कामांचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १५ वा वित्त आयोग बंधनकारक अनुदानापैकी पाणी पुरवठा कामासाठी अनुदान | रू. १८,१०,३९,८९०/- |
| उपरोक्त अनुदानातून पाणी पुरवठा कामांसाठी यापूर्वी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार होणारा खर्च (परीशिष्ट-१) (३००० नळ संयोजनांचा गृहीत धरून) | रू. ८,४७,३०,४६२/- |
| १५ वित्त आयोगाच्या पाणी पुरवठा कामांसाठी बंधनकारक अनुदानातून मंजूर कामांवरील खर्च वगळून शिल्लक रक्कम | रू. ९,६३,०९,४२८/- |
| मूळ कामे पूर्ण करण्यासाठी खंड-३८ नुसार आवश्यक रक्कम | रू. ७,३५,१६,३९४/- |

१५ व्या वित्त आयोगाच्या निधी विनियोगाच्या दि.२८.१०.२०२० मधील अ.क्रं.०२(अ) बंधनकारक अनुदानातून पाणी पुरवठा संबंधित कामांवर निधी विनीयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार भांडवली कामावर निधी खर्च करणे अनुज्ञेय आहे. खंड-३८ मधील कामे करण्यासाठी लागणारा खर्च १५ वित्त आयोगाच्या बंधनकारक अनुदानातून पाणी पुरवठा कामांसाठी प्रस्तावित असलेल्या निधीपैकी शिल्लक निधीतून करता येणे शक्य आहे.

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जळगाव यांची खंड-३८ मधील कामे तांत्रिकदृष्टया योग्य असल्याने कामे करण्याबाबत केलेली शिफारस, मूळ कामे पूर्ण करण्यासाठी वाढीव परीमाणांचे काम करण्याची असलेली आवश्यकता विचारात घेता, वाढीव खर्च रू.७,३५,१६,३९४/- १५ व्या वित्त आयोगाच्या पाणी पुरवठयासाठी बंधनकारक अनुदानातून करणेस व कामासाठी येणारा सुधारीत खर्च रू.२६०,५९,१४,८९४/- ला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे १८९ अन्वये महानगरपालिकेची सुधारीत प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी महानगरपालिका सभेची सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-
(ज्ञानेश्वर ढेरे)
प्रशासक
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- २१** **प्रशासक ठराव क्र :-११५** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल प्रस्ताव पा.पु.विभाग/जा.क्र./१००/२०२४-२५ दि.११/०७/२०२४
३. शहर अभियंता यांचा दि.३/०७/२०२४ रोजीचा अभिप्राय
४. सहा.आयुक्त (बांधकाम) यांचा दि.०८/०७/२०२४ चा अभिप्राय अभिप्राय
५. मुख्य लेखाधिकारी यांचा दि.०९/०७/२०२४ चा अभिप्राय
६. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.१०/०७/२०२४ चा अभिप्राय
७. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१०/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील मनपा निधी सन-२०२४-२५ या आर्थीक वर्षात वाघुर रॉ वाटर व शहरातील पर्पीग स्टेशन व तेथील सब स्टेशन मेंटनन्स कामी बाबवार दराप्रमाणे आवश्यकतेनुसार विविध उपकरणे व साहीत्य पुरविणे व दुरुस्ती करणे या कामाचे अंदाजीत रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील मनपा निधी " सन-२०२४-२५ या आर्थीक वर्षात वाघुर रॉ वाटर व शहरातील पपींग स्टेशन व तेथील सब स्टेशन मेंटनन्स कामी बाबवार दराप्रमाणे आवश्यकतेनुसार विविध उपकरणे व साहीत्य पुरविणे व दुरुस्ती करणे " कामांचे खालीलप्रमाणे अंदाजपत्रक MJP २०२३-२४ चे दरानुसार तयार करणेत आलेले असुन उक्त कामांना शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता मिळालेली आहे.

सदरची कामे मनपा निधी अंतर्गत लेखाशिर्ष " मशिनरी देखभाल व दुरुस्ती " या लेखाशिर्षा करीता मंजुर केलेली बजेट तरतुद रक्कम रु.५० लक्ष इतकी तरतुदी मधुन करणेत येईल. उक्त कामांचे अंदाजित रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळणेस व उक्त कामी निविदा प्रसिध्द करणेस प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १. | सन-२०२४-२५ या आर्थीक वर्षात वाघुर रॉ वाटर व शहरातील पपींग स्टेशन व तेथील सब स्टेशन मेंटनन्स कामी बाबवार दराप्रमाणे आवश्यकतेनुसार विविध उपकरणे व साहीत्य पुरविणे व दुरुस्ती करणे | रु.४१,६५,०००/- |

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- २२** **प्रशासक ठराव क्र :-११६** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल प्रस्ताव पा.पु.विभाग/जा.क्र./१०१/२०२४-२५ दि.११/०७/२०२४
३. शहर अभियंता यांचा दि.०८/०७/२०२४ चा अभिप्राय
४. सहा.आयुक्त (बांधकाम) यांचा दि.०८/०७/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.१०/०७/२०२४ चा अभिप्राय
६. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१०/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत भागात पाणी पुरवठा करणेकामी व्हालमन पुरविणे या कामाचे अंदाजीत रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागात क्षेत्रात जलकुंभावरुन दैनंदिन पाणी पुरवठा करणे कामी लागणारे व्हालमन सेवा निवृत्त झाल्याने संख्या कमी झालेली आहे. त्यामुळे पाणी पुरवठा करणेस अडचणी येत आहेत. तरी विविध जलकुंभावर पाणी पुरवठा करणे कामी व्हालमनची कमतरता असल्याने सदरचे ठिकाणी पाणी पुरवठा करणेकामी व्हालमन पुरविणे कामी निविदा मागवुन व्हालमन पुरविणे कामी अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. उक्त कामी कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लाक बांद्रे कुर्ला, वांद्रे (पु) मुंबई ४०००५१ दि.१/२/२०२३ चे किमान वेतन नुसार परीमंडळ १ (महानगरपालिका) अन्वये वेतन दरानुसार अकुशल कामगार पुरविणे आवश्यक आहे.

त्यानुसार उक्त कामी केलेल्या अंदाजपत्रकानुसार येणारा खर्च रुपये-३३,४३,५७६/- चे खर्चास पाणी पुरवठा व्यवस्था दुरुस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत मनपा निधी अंतर्गत प्रस्तावित होणेस प्रशासकीय व तांत्रिक मंजूरीस्तव उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो मुदतवाढ देण्यात येत आहे.

तथापी मनुष्यबळ पुरविणेबाबत एकाच अभिकर्त्याची नियुक्ती करणे उचित असल्याने सर्व विभागासाठी मनुष्यबळ पुरविणेकामी निविदा प्रक्रिया ही सामान्य प्रशासन आस्थापना विभागामार्फत राबविणेत यावी, तशी मागणी आस्थापना विभागाकडे नोंदवावी. त्याचबरोबर ज्या ज्या विभागांना बाह्ययंत्रणेमार्फत पुरविणेत येणाऱ्या मनुष्यबळाची आवश्यकता असेल, अशा सर्व विभाग व विभाग प्रमुख यांनी आवश्यक मनुष्यबळाच्या तपशीलासह (कुशल / अकुशल) (पदनाम व संख्या) उपायुक्त (सा.प्र.) यांचेकडेस मागणी नोंदवावी व आस्थापना विभागामार्फत बाह्ययंत्रणेमार्फत पुरविणेत येणाऱ्या मनुष्यबळा संदर्भातील, नियम, शासन निर्णय, मार्गदर्शक तत्वे इ. बाबी विचारात घेवून निविदा प्रक्रिया राबवावी व निविदा प्रक्रिये संदर्भातील उचित व आवश्यक तो प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करावा व तदनंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. तथापि सदर निविदा

प्रक्रिया अंतिम होईपावेतो प्रस्तुत अभिकर्त्यास मनुष्यबळ पुरविणेकामी मुदतवाढ देणेत येत आहे. नविन निविदा प्रक्रिया सा.प्र.विभागाने नियमानुसार यथाशीघ्र अंतिम करणेची दक्षता घ्यावी

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- २३** **प्रशासक ठराव क्र :-११७** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल प्रस्ताव पा.पु.विभाग/जा.क्र./१०२/२०२४-२५ दि.११/०७/२०२४
३. शहर अभियंता यांचा दि.०८/०५/२०२४ चा अभिप्राय
४. सहा.आयुक्त (बांधकाम) यांचा दि.१०/०५/२०२४ चा अभिप्राय
५. मुख्य लेखाधिकारी यांचा दि.२५/०६/२०२४ चा अभिप्राय
६. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२७/०६/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** वाघुर पा.पु.अंतर्गत टाकण्यांत आलेल्या मुख्य जलवाहीनी १५०० मीमी ते ४५७ मीमी P.S.C.&M.S लाईनची वार्षिक दुरुस्तीबाबत.

---

वाचा क्र.१ व उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

पाणी पुरवठा विभागाकडील वाघुर योजनेतील मुख्य जलवाहीनी १५०० मीमी ते ४५७ मीमी व्यासाच्या P.S.C.&M.S पाईप लाईन व त्यावरील एअर व्हॉल्व यांचे दुरुस्ती करणेकामी सन २०२३-२४ करीता कार्यादेश देणेत आला होता. सदर कामाची मुदत दि.१९/०७/२०२४ पर्यंत असली तरी कार्यादेशानुसार कामे पुर्ण झालेली असल्याने नवीन निविदा त्वरीत काढणे आवश्यक आहे. संपुर्ण शहराचा पाणी पुरवठा मुख्यत: हयावरच अवलंबून असल्याने काम त्वरीत करावे लागते. भविष्यात पाईप लाईन दुरुस्ती अभावी पाणी पुरवठा बंद पडू नये म्हणून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता मुख्य जलवाहीनी दुरुस्तीकामी मजीप्रा दरसुची सन २०२३-२४ च्या दरानुसार रक्कम रु.३८,५०,३१३/- (१८% जी.एस.टी.सह) मात्रच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

जळगांव शहरात पाणी पुरवठा करणारी रायपुर धरण ते उमाळा फिल्टर प्लॅन्ट, फिल्टर प्लॅन्ट ते जळगांव शहरातील गिरणा टाकी, आकाशवाणी टाकी, सिंधी कॉलनी टाकी, ड्रिमलॅण्ड टाकी, पिंप्राळा, निमखेडी, खोटेनगर टाकी पर्यंतची मुख्य पी.एस.सी.पाईप १५०० मीमी ते ६०० मीमी तसेच सी.आय.डी.आय. पाईप या मुख्य टाकी भरावयाचे रायझींग मेन लाईन दुरुस्तीकामी मागील वर्षाची वार्षिक निविदा दि.१९/०७/२०२४ पर्यंत मुदत आहे. मात्र त्या निविदेमध्ये अंदाजित खर्च पेक्षा अधिक खर्च झालेला आहे.

तरी पुढील वर्ष २०२४-२५ करीता सदरचे मुख्य लाईन वरील गळती दुरुस्ती, एअर व्हॉल दुरुस्ती कामी निविदा तातडीने काढणे आवश्यक आहे. सदरची मुख्य जलवाहीनी वर गळती उदभवल्यास संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा बंद पडेल. तरी उक्त कामी येणारा अंदाजित खर्च रु.३८,५०,३१३/- इतका खर्च मनपा पाणी पुरवठा व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षका अंतर्गत तांत्रिक मान्यता मिळणेस तसेच सदरचे काम हे अत्यावश्यक असून उक्त कामी नियमित वेळेत निविदा काढून कार्यादेश देणेची कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही करणेस मान्यता मिळणे व वाघुर जलवाहीनीचे वार्षिक देखभाल व्यवस्थेचे कामी येणारा अंदाजित खर्च रक्कम रु.३८,५०,३१३/- मात्र मनपा निधीतून करणेस तसेच याकामाची स्वतंत्र ई-निविदा अटी-शर्तीसह तयार करुन प्रसिध्द करणेस मान्यता मिळण्यासाठी उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. विभागाने नियमाप्रमाणे अटी-शर्ती निश्चित करुन घ्याव्यात.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- २४** **प्रशासक ठराव क्र :-११८** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांचेकडिल जा.क्र./आरोग्य वि./४०७/२०२४-२५ दि.११/०७/२०२४
३. सहा.आयुक्त (आरोग्य) यांचा दि.०५/०७/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.११/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** घंटागाडीव्दारे शहरातील वार्ड निहाय दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील कचरा तसेच उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उदयाने येथील निघणारा कचरा संकलन करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पापर्यंत वाहतूक करणे तसेच शहरातील वार्ड निहाय दैनंदिन रस्ते, गटार इ. साफसफाई करणे करिता ४०० कामगार पुरवठा करणे कामी मक्तेदार मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांना मुदतवाढ देणेबाबत.

---

वाचा क्र.१ व आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मा.महासभा ठराव क्र.१४९ दि.०६/०६/२०१९ अन्वये व मा.स्थायी समिती सभा ठराव क्रं.१२६ दि.०६/०७/२०१९ नुसार मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस, नाशिक यांना ५ वर्ष कालावधी करीता घंटागाडीव्दारे शहरातील वार्ड निहाय दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील कचरा तसेच उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उदयाने इ. सर्व ठिकाणाचा घनकचरा (ओला व सुका) वेगवेगळा संकलन करुन ट्रान्सफर कलेक्शन सेंटर पर्यंत वाहतूक करुन सुका कचरा उतरविणे व ओला कचरा रिफ्युज कॉम्पॅक्टरमध्ये लोड करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पापर्यंत वाहतूक करणे तसेच शहरातील वार्ड निहाय दैनंदिन रस्ते, गटार इ. साफसफाई करणे करिता कामगार पुरवठा करणे बाबत महानगरपालिकेस दि.१४/०८/२०१९ रोजी करुन दिलेली संविदा व कार्यादेश क्रं.३८२ दि.१४/०८/२०१९ नुसार मक्ता देण्यात आलेला आहे.

मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांना कार्यादेश क्रं.३८२ दि.१४/०८/२०१९ रोजी देण्यात आलेल्या कार्यादेशानुसार मक्तेदार यांनी सदरचे काम दि.१६/०८/२०१९ पासुन सुरु केले असुन सदर मक्त्याची मुदत दि.१५/०८/२०२४ रोजी संपुष्टात येत आहे.

अभिकर्त्याची नेमणुक करणेकामी ई-निविदा तयार करण्यात आलेली होती परंतु लोकसभा आचारसंहिता तसेच शिक्षण मतदार आचारसंहिता असल्यामुळे सदरची ई-निविदा प्रसिध्द करण्यास विलंब झालेला आहे.

सन २०२४-२५ ते सन २०२७-२८ या ३ वर्ष कालावधीसाठी अभिकर्त्याची नेमणुक करणेकामी ई-निविदेचा मसुदा व अंदाजपत्रकिय खर्चास मा.महासभा तथा प्रशासक यांची मान्यतेसाठी डॉकेट सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तद्नंतर शासन निर्णयानुसार ई-निविदा शासन संकेतस्थळावर प्रसिध्द करणे व संपुर्ण प्रक्रियेसाठी कमीत कमी ३ ते ४ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मक्तेदार मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांना देण्यात आलेली मक्त्याची मुदत दि.१५/०८/२०२४ रोजी संपुष्टात येत असुन मक्तेदार यांना सन २०२४-२५ ते सन २०२७-२८ या ३ वर्ष कालावधीसाठी अभिकर्त्याची नेमणुक होईपावेतो मुदतवाढ देणे योग्य होईल. सदर मक्तेदारास मुदतवाढ दिल्यास प्रति माह अंदाजे १ कोटी ९० लक्ष रुपये खर्च अपेक्षित आहे.

सन २०२४-२५ ते सन २०२७-२८ या ३ वर्ष कालावधीसाठी अभिकर्त्याची नेमणुक होईपावेतो मे.वॉटरग्रेस प्रॉडक्टस,नाशिक यांना मुदतवाढ देणेस मान्यता मिळण्यासाठी आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो मुदतवाढ देणेस मंजूरी देण्यात येत आहे. विभागाने तात्काळ निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही करावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२३** **(महासभा)**

**विषय क्र.:- २५** **प्रशासक ठराव क्र :-११९** **दिनांक :-१९/०७/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./जमनपा/प्रकल्प विभाग/३६/२०२४ दि.१०/०७/२०२४
३. उपायुक्त यांचा दि.१०/०७/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.११/०७/२०२४ चा अभिप्राय
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१०/०७/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव पाणी पुरवठा योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि.ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स, औरंगाबाद संयुक्त उपक्रम करार (जेव्ही) यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकास शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत समाविष्ट करणेसाठी प्रस्ताव सादर करणेस व अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानाअंतर्गत जळगाव शहराच्या पाणी पुरवठा योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स, औरंगाबाद यांना काम करणेबाबत कामाचे कार्यादेश दिलेले आहे. त्यानुसार सदर कामी सल्लागार यांनी प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम करून महानगरपालिकेस सादर केलेला आहे. सदर कामांसाठी प्रकल्प अहवालानुसार रू.४१४,६१,३४,७५८/- खर्च या कामी येणार आहे. सदर अहवाल तांत्रिक तपासणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जळगाव यांचेकडे पाठविलेला होता. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जळगाव यांचे पत्रा अन्वये यात असलेल्या त्रुटींची पूर्तता करणेबाबत कळविलेले होते. त्यानुसार सल्लागार यांनी त्रृटींची पुर्तता करून इकडेस सुधारीत अंदाजपत्रके सादर केली आहे. सदर अंदाजपत्रक तपासणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास पाठविण्यात आलेली आहे. सदर कामी प्रस्तावनेनुसार उपांग निहाय अंदाजपत्रकीय खर्चाचे विवरण पत्र प्रस्तावात दिलेले आहे. त्यानुसार सदर प्रस्तावित योजनेचा आकृतीबंध खालील प्रमाणे येतो.

| प्रकल्पाची किंमत | केंद्र शासन अनुदान ३३.३३% | राज्य शासन अनुदान ३६.६७% | महानगरपालिका हिस्सा ३०% |
|---|---|---|---|
| रू. ३६१,७६,८९,६०८/- | रू.१२०,५७,७५,९५०/- | रू.१३२,६६,०६,७८०/- | रू. १०८,५३,०६,८७८/- |

सदर कामाच्या रू. ३६१.७६.८९,६०८/- अंदाजपत्रकीय खर्चास महासभा ठराव क्रं.४९ दि.११.०१.२०२४ नुसार प्रशासकीय मान्यता व महासभेने यापूर्वी महासभा ठराव क्र.८६९ दि.०८.०८.२०२२ नुसार अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार महानगरपालिका हिस्याची रक्कम उभारणी करणेस, पाण्याची मागणी, योजनेच्या कामासाठी भविष्यात येणारे प्रस्तावित उत्पन्न व खर्च यांचे ताळमेळानुसार पाणी पटटी कराची रक्कम भविष्यात योजना पूर्ण झाल्यावर आकारणी करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. तथापि जळगाव महानगरपालिकेने पाणी पुरवठा सेवेसाठी अमृत २.० मध्ये City Water Balance Plan सादर करतांना रू.१८०.७५ कोटी व ५ वर्षे देखभाल दुरूस्तीसाठी ३९.२५ कोटी असे रू.२२०.०० कोटी रकमेचे प्रावधान केलेले होते. सदर कामी तांत्रिक छाननीवेळी झालेल्या चर्चेनुसार प्रकल्पाची सविस्तर प्रकल्प अहवालाची किंमत ही प्रावधान केलेल्या रकमेपेक्षा जास्त असल्याने मान्यतेकामी प्रकल्प प्रावधान केलेल्या रकमेच्या मर्यादेत सादर करण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार खालील उपांगे अमृत २.० अंतर्गत समाविष्ट करून घेणे कामी रू.१८५,७५,६९,०१७/- खर्चाचा प्रस्ताव स्वतंत्रपणे सादर केलेला आहे. प्रस्तावित प्रकल्प अहवालातील खालील उपांगे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत समाविष्ट करणेस प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| Sr.No. | Name of Sub Work | Cost in Rs. | Cost in Cr |
|---|---|---|---|
| **A** | **Civil Estimate** | | |
| 1 | Working Survey | 2511750.00 | 0.25 |
| 2 | Repairing to Existing Raw Water Gravity Main - L: 350m | 3829020.00 | 0.38 |
| 3 | Raw Water Rising Main - L: 7.35 Km (OD- 1168 mm and 10 mm thk) | | 0.00 |
| 4 | Repairing to Existing Raw Water Rising Main -L: 7.35 Km (OD-1168 mm and 10 mm thk) | 11144550.00 | 1.11 |
| 5 | Water Treatment Plant (Conventional -35 MLD) | 93486363.00 | 9.35 |
| 6 | Recirculation Sump and Pump House | 2499853.00 | 0.25 |
| 7 | Wash Water Rising Main to Aeration Fountain (150 mm dia DI K-9, L=100m) | 332672.00 | 0.03 |
| 8 | Repairing of Existing MBR 26.00MLD GMBR | 19176655.00 | 1.92 |
| 9 | Pure Water Gravity Main -L:11.4 Km (ID- 1500 mm and 10 mm thk) | 635392060.00 | 63.54 |
| 10 | Pure Water Transmission Main (DIK -7400 to 800 mm Dia Total Length 11.2Km) | 138346288.00 | 13.83 |
| 11 | Sump @ DSP ESR Cap: 9LL | 7583023.90 | 0.76 |
| 12 | Proposed ESR 9 Nos | 168097032.00 | 16.81 |
| 13 | Dismantling of Existing 3 Nos ESR Capacity 2.00ML 2.50ML, 2.80ML & Staging 12.50Mtr, 15.50Mtr, 12.50Mtr, | 19223000.00 | 1.92 |
| 14 | Repairs to Samta Nagar ESR | 316910.00 | 0.03 |
| 15 | Compound Wall For Proposed ESR & WTP | 15056908.00 | 1.51 |
| 16 | Retaining Wall for Samata Nagar ESR | 3535449.00 | 0.35 |
| 17 | Distribution System (L= 21.479 KM) | 71793966.00 | 7.18 |
| 18 | House Service Connection (5000 nos) | 14461500.00 | 1.45 |
| 19 | Road Restoration (10Km) | 41026863.00 | 4.10 |
| 20 | Approach Road for WTP L-300Mtr | 2216858.00 | 0.22 |
| 21 | Construction of Godown | 1956741.00 | 0.20 |
| 22 | Trial and Run | 3808230.00 | 0.38 |
| | **Net cost Rs. (A)** | **1255795692** | **125.58** |
| **B** | **Mechanical Estimate** | | |
| 23 | Designing providing, erecting, testing and commissioning of Raw water Pumping Machinery with allied Works Electrical and Mechanical equipments. (750 HP/560 KW) (2W+1S) For Rising Main 1 & Rising main 2 | | 0.00 |
| 24 | Recycling Pumping Machinery at WTP 7.5HP (1W+1S) & 3 HP (1W+1S) | 1272510.00 | 0.13 |
| 25 | Electrifications Work Of Existing WTP | 818785.00 | 0.08 |
| 26 | Transformer & Substation for WTP | 3100879.00 | 0.31 |
| 27 | Pure Water Pumping Machinery at 150 HP DSP Chauk Sump Well Ext & Pro ESR | 8944135.00 | 0.89 |
| 28 | Automation Work | 93892021.00 | 9.39 |
| 29 | Ultrasonic Water Meter (90000 nos) | | 0.00 |
| 30 | Solar Power Plant- 515 KWp | 20213744.00 | 2.02 |
| 31 | Express Feeder Work | | 0.00 |
| | **Net cost Rs. (B)** | **128242074** | **12.82** |
| | **Net cost Rs. (A+B)** | **1384037766** | **138.40** |
| **C** | **Permissions:** | | |
| 32 | National Highway/State Highway / MIDC Road Permission for PWGM | 5075000.00 | 0.51 |
| 33 | Railway Crossing Permission for PWRM/PWGM | 30000000.00 | 3.00 |
| 34 | Forest / Irrigation Permission Charges | 5000000.00 | 0.50 |
| | **Net cost Rs. (C)** | **40075000** | **4.01** |
| | | | |
| | **Net cost Rs. (A+B+C)** | **1424112766** | **142.41** |
| | Add 18% for GST on A&B | 249126798.00 | 24.91 |
| | Add TS Charges 1% | 14241128.00 | 1.42 |
| | Labour Insurance 1% | 12793563.23 | 1.28 |
| | **Net Cost Including GST** | **1700274255** | **170.03** |

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १८९ नुसार रक्कम रू. १७०,०२,७४,२५५/- अंदाजपत्रकीय खर्चास महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळणेस,
२) शासन निर्णय दि.२२.०२.२०२४ मध्ये अ.क्रं.११ मध्ये नमूद ०५ सुधारणांची अंमलबजावणी करणेस मान्यता मिळणेस,
३) शासन निर्णय दि.२२.०२.२०२४ मध्ये अ.क्रं.१५ मध्ये नमूद केल्यानुसार रू.५१,००,८२,२७७/- स्वहीस्सा निधी उभारणेसाठी राष्ट्रीयकृत बँकाकडून, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादित, अथवा केंद्र वा राज्य शासन मान्य वित्तीय संस्थांकडून कर्ज या पर्यायां पैकी पर्याय विचारात घेवून निधी उभारणी कामी शासनास परवानगी प्रस्ताव राज्यस्तरीय समन्वय संस्थेमार्फत शासनास सादर करणेस मान्यता मिळणेस,

| प्रकल्पाची किंमत | राज्य शासन अनुदान ७०% | महानगरपालिका हिस्सा ३०% |
|---|---|---|
| रू. १७०,०२,७४,२५५/- | रू.११९,०१,९१,९७९/- | रू. ५१,००,८२,२७७/- |

उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


